दि. दा. क्र.**५१०/२०२३**
ऋषीकेश वि. सचिव व इतर
नि.क्र. ०/८६

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. ४ तर्फे विद्वान वकील श्री. एस. बी. पांडे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

८. मला चार बहिणी आहेत. आम्हा भावा बहिणीमध्ये वाटणी झालेली नाही. माझे वडीलांना एकुण तिन भाऊ होते. त्यांची नावे बळवंतराव, मधुकर आणि पांडुरंग होते. बळवंतराव हे माझे जन्माच्या पुर्वी वारले. त्यांना चार मुली आहेत. माझे वडील व त्यांच्या भावांना बेळकुंड येथील परिसरामध्ये एकुण किती जमिन होती हे मला माहिती नाही. या चौघा भावांमध्ये वाटण्या झाल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, आत्तापर्यंतही त्यांच्यामध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ चा जुना सर्वे क्र.१८५ होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे एकुण क्षेत्र २४ एकर ३७ गुंठे असे होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ मधुन जुना औसा तुळजापूर १९६० पुर्वीपासून गेलेला आहे. त्या रस्त्यामधुन गट क्र. ३०२ जुना सर्वे क्र. १८५ मधील किती क्षेत्र संपादीत झाले याची मला माहिती नाही. रस्त्यामध्ये संपादीत झालेली जमिन अंदाजे २ ते ३ एकर होती. गट क्र. ३०२ मधील अंदाजे २ ते ३ एकर जमिन शासनाने संपादीत केली त्याची नोंद ७/१२ उतारावर दिसुन येत नाही. मी गट क्र. ३०२ चे १९८५ पासून ७/१२ चे उतारे पाहिले आहेत. त्यापुर्वीचे ७/१२ चे उतारे मी पाहिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ च्या ७/१२ च्या उतारा–यामध्ये सन १९८५ पासून कोठेही नोंद दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुना रस्त्यामध्ये गट क्र. ३०२ मध्ये २ ते ३ एकर जमिन शासनाने संपादीत केल्यामुळे आमची एकुण जमिन कमी झाली होती. जमिन कमी झालेनंतर आमच्याकडे एकुण जमिन किती शिल्लक राहिली याकरिता जमिनीची मोजणी केली नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, औसा तुळजापूर रस्त्यामुळे गट क्र. ३०२ मधील जमिनीचे दोन तुकडे झाले. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ चा एक तुकडा औसा तुळजापूर रस्त्याच्या पुर्वेला आहे व दुसरा तुकडा औसा तुळजापूर रस्त्याच्या पश्चिमेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, औसा तुळजापूर रस्त्याच्या पश्चिमेला असलेले क्षेत्र कमी आहे व

पुर्वेला असलेले क्षेत्र जास्त आहे. गट क्र. ३०२ मध्ये किती क्षेत्र औसा तुळजापूर रस्त्याच्या पुर्वेला व किती क्षेत्र पश्चिमेला आहे याची माहिती मला नाही. सदरचा दावा हा औसा तुळजापूर रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या क्षेत्राबाबत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ च्या पश्चिम बाजुच्या तुकडयाच्या पुर्व–दक्षिण बाजुला औसा तुळजापूर रस्ता आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ च्या पश्चिम तुकडयाच्या उत्तरेला गट क्र. ३१७ मध्ये बालाजी साळुंके यांची जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, बालाजी साळुंके यांच्या जमिनीच्या पश्चिम बाजुस दत्तु कांबळे आणि बंकट कांबळे यांच्या जमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या पश्चिमेला गट क्र. १४४ मध्ये शंकर पडुळे यांची जमिन आहे जी त्यांनी मधुकर रोडगे यांना विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ च्या पश्चिम तुकडयाच्या पश्चिम उत्तर बाजुला गट क्र. ३०३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०३ ही आमच्या कुटूंबाची जमिन होती. हे म्हणणे खरे आहे की, ती जमिन पुर्वीपासून माझे चुलते पांडुरंग देशमुख यांच्या नावावर होती. गट क्र. ३०३ ची आजपर्यंत वाटणी झालेली नाही.

११. गट क्र. ३०२ मधील उत्तरेकडील क्षेत्र १ हेक्टर १७ गुंठे जमिन ही माझे वडील काशिराम यांना कौटुंबिक व्यवस्थेमध्ये १९९४–१९९५ साली देण्यात आली. १ हेक्टर १७ आर जमिनीची चतु:सिमा मला सांगता येतील. पुर्वेला औसा तुळजापूर रस्ता आहे, पश्चिमेला गट क्र. ३०३ आहे, दक्षिणेला गट क्र. ३०३ आहे आणि उत्तरेला बालाजी साळुंके यांची जमिन आहे. पुर्वी वाटणीला कौटुंबिक व्यवस्था म्हणत असत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ ची १९९४–१९९५ साली तोंडी वाटणी झाली. त्या वाटणीमध्ये गट क्र. ३०२ मधील क्षेत्र १ हेक्टर १७ आर जमिन माझे वडीलांना मिळाली. गट क्र. ३०२ मधील बाकीची जमिन मधुकर आणि त्यांचा मुलगा अभय यांना देण्यात आली. त्यानुसार १९९४–१९९५ साली फेरफार झाला. मी तो फेरफार पाहिलेला नाही. त्या फेरफारची नक्कल मी याकामी दाखल करू शकतो.

१२.  मला आता यादी नि.क्र. ५६ सोबत अ.क्र. ४ वर दाखल केलेला फेरफार क्र. ४६१ दाखवले असता त्याप्रमाणे सर्वे नंबर १८५ आणि १८६ च्या वाटण्या सन १९८२ साली झाल्या होत्या. सदर फेरफार साक्षीदारास उलटतपासामध्ये दाखवले असता व ते साक्षीदारास मान्य असल्याने त्यास **नि.क्र.९१** देण्यात येते. वाटणी पत्र दि.२४/०४/१९८२ माझेकडे नाही. सदरचे वाटणीपत्र तहसील कार्यालयामधून काढावे लागेल. हे म्हणणे खरे आहे की, या वाटणीनुसार गट क्र. ३०२ मधील पश्चिम बाजुची २ एकर ३७ गुंठे जमिन माझे वडील काशिराव यांच्या हिस्स्यास देण्यात आली होती. सदर जमिनीच्या पुर्वेला मधुकर व अभय यांची जमिन आहे व त्यांच्या जमिनीच्या पुर्वेला रस्ता आहे. वास्तविक वाटणी १९८२–१९८३ साली झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पुन्हा हिस्स्यांमध्ये बदल झाला नाही. साक्षीदार सांगतो की अभय यांनी गट क्र. ३०२ मधील काही जमिन चॉद यांना विकली व शिल्लक राहिलेली अभयची रस्त्यालगतची ३७ गुंठे जमिन वडीलांना दिली. त्याच ३७ गुंठयाचा दावा मी केलेला आहे. अभय यांनी सदर ३७ गुंठे जमिनीचा कोणताही दस्त माझे वडीलांच्या नावे करून दिला नाही. सदरचा व्यवहार तोंडी होता.

१३.  हे म्हणणे खरे आहे की, सन १९९४ साली माझे वडीलांनी गट क्र. ३०२ मधील ८० आर जमिन नामदेव दौला साळुंके यांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिन गट क्र. ३०२ मधील पुर्व उत्तर बाजुची होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदी खतामध्ये नामदेवच्या जमिनीला लागुन पश्चिमेस आमची शिल्लक जमिन दाखविली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तसेच नामदेवला जी जमिन विकली त्याच्या दक्षिणेस अभय आणि मधुकर यांची जमिन दाखविली आहे आणि उत्तरेला बालाजी साळुंके यांची गट क्र. ३१७ मधील जमिन दाखविली आहे.

१४.  गट क्र. ३०३ चे एकुण क्षेत्र मला माहित नाही. गट क्र. ३०३ च्या वाटण्या झाल्या होत्या. गट क्र. ३०३ मध्ये २ ते अडीच एकर माझा वडीलांचा हिस्सा होता. हे म्हणणे खरे आहे की, नामदेवला जी जमिन विक्री केली त्याच्या पश्चिमेला गट क्र. ३०२ मधील

उर्वरीत जमिन होती. त्याच्या पश्चिमेला गट क्र. ३०३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९४ साली माझे वडीलांनी चॉद यास ८३ आर जमिन विक्री केली. त्याचे खरेदी खत मी पाहिले आहे. त्या खरेदी खताप्रमाणे नामदेव साळुंके यांच्या जमिनीच्या पश्चिमेकडील ८३ आर जमिन माझे वडीलांनी विक्री केली आहे. सदर जमिन ही गट क्र. ३०२ मधील आहे. अभय याने गट क्र. ३०२ मधील १ हेक्टर १२ आर जमिन चॉद यास २००१ साली विक्री केली. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांनी गट क्र. ३०२ मधील एकुण १ हेक्टर ६३ आर जमिन चॉद व नामदेव यांना विक्री केली.

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांना गट क्र. ३०२ मधील नेमकी कोणती जमिन वाटणीमध्ये मिळाली होती याबाबत माझेकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. सन २००० पासून चॉद यांची विटभट्टी रस्त्यालगत आहे. चॉद याने विटभट्टीच्या पश्चिमेला व उत्तरेला बोर पाडले आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही. विटभट्टीच्या उत्तरेस चॉद याचे त्याच्या जागेमध्ये घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, विटभट्टीच्या पश्चिमेला रस्त्यालगत मनोज पाटील यांची ४० आर जमिन आहे. ती जमिन मनोज पाटील यास चॉद याने विक्री केली. हे म्हणणे खरे आहे की, ४० आर जमिनीपैकी १४ आर जमिन राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादीत झाली आहे. त्याचे पैसे मनोज पाटील यांनी उचलले. हे म्हणणे खरे आहे की, विटभट्टीच्या पुर्वेला रस्त्यालगत लाला सययद यांचा ढाबा होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर ढाब्याची जमिन चॉद याने लाला यास विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यातील काही भाग राष्ट्रीय महामार्गामध्ये संपादीत झाला व त्याचे पैसे लाला याने घेतले. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३०२ मध्ये जमिन विक्री केल्यानंतर माझे वडीलांची एक इंच ही जमिन शिल्लक नव्हती.

१६. माझे वडीलांनी चॉद यास विटभट्टीची जमिन फुकट वापरण्यास दिली होती. चॉद याच्याकडून विटभट्टीच्या जमिनीबाबत कोणताही दस्त लिहुन घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत होऊन उरलेल्या जमिनीवर चॉद यांचा ताबा आहे. गट क्र. ३०२

दि. दा. क्र.५१०/२०२३
ऋषीकेश वि. सचिव व इतर
नि.क्र. ०/८६

मध्ये माझे ताब्यातील ३७ आर जमिनीपैकी एकुण २० गुंठे जमिन राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत झाली. हे म्हणणे खरे आहे की, २० गुंठेची मोजणी, ताबा पंचनामा आणि अवॉर्ड हे चॉदच्या नावाने झाले. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३०२ मधील १ हेक्टर १७ आर क्षेत्रा व्यतिरिक्त इतर कुठल्याही क्षेत्रावर माझा मालकी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३०२ मधील संपादीत झालेली २० आर जमिन चॉदच्या मालकीची आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यामध्ये संपादीत झालेली जमिन माझी आहे व मला पक्षकार करावा असा अर्ज अभय यांनी दिला होता तो फेटाळण्यात आला. तसेच नामदेव साळुंके यास माझे वडीलांनी विक्री केलेल्या जमिनीपैकी काही जमिन महामार्गासाठी संपादित झाली होती त्याचा मावेजा नामदेव साळुंके यास मिळालेला आहे. नि.क्र.९१ वरिल फेरफारमध्ये लेखी वाटणी पत्राचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटण्या तोंडी नसून लेखी झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वाटणी पत्र बघितल्याशिवाय कोणाला कोणता हिस्सा वाटुन दिला होता हे समजु शकत नाही. माझे म्हणण्याप्रमाणे नंतर जे बदल झाले त्याचा कागदोपत्री पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादित जमिनीशी माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ ७/१२ वरिल दाखवलेल्या क्षेत्राचा फायदा घेऊन संपादित क्षेत्राचा मावेजा हडप करण्यासाठी हा मी खोटा दावा केला आहे.
उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.07.24 15:03:26 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–२४.०७.२०२५. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.